**म्हाडा**

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

उपमुख्य अधिकारी/पुगा, गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.१७१, दुसरा मजला, कलानगर, वांद्रे(पू), मुंबई-५१

जाहीरात क्रमांक :1914/२०२६

## जाहिरात

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील उपकर प्राप्त इमारतीमधील ज्या भाडेकरु / रहिवाशी यांना निष्कासन सूचना (व्हेकेशन नोटीस) देऊन इमारत खाली करण्यात आलेली आहे व त्यांच्या मूळ इमारतीचा अरुंद भूखंड , आरक्षण, रस्ता रुंदीकरण इत्यादी कारणामुळे पुनर्विकास शक्य नाही. तसेच उपकरप्राप्त इमारती पुनर्रचित झालेल्या आहेत, परंतु कमी गाळे बांधले गेले आहेत अशा वंचित मुळ भाडेकरु / रहिवाशी यांना यापूर्वी मंडळाद्वारे पुनर्रचित / पुनर्विकसित इमारतीमध्ये कायमस्वरुपी गाळा देण्यात आलेला नाही व त्यांचे वारसदार संक्रमण शिबीरात स्वत: अधिवास धारण करीत आहेत. अशा खऱ्याखुऱ्या मूळ भाडेकरु / रहिवाशी अथवा त्यांचे वारसदार यांचेकडून <u>दि.०१/०५/२०२६ सकाळी १०.०० वाजता पासून ते दि.२०/०५/२०२६ रात्री ११.५९ पर्यंत</u> बृहतसूचीवरुन पात्रता निश्चित. करुन गाळे वितरणासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जदाराची नोंदणी व ऑनलाईन अर्ज भरण्याची पध्दत म्हाडा संकेतस्थळ **masterlist.mhada.gov.in** वर उपलब्ध आहे.

**<u>ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दत खालील प्रमाणे.</u>**

Step -१. सर्वप्रथम अर्जदार यांनी म्हाडा संकेतस्थळ <u>www.mhada.gov.in</u>. वर citizen corner मध्ये जाऊन Application for Masterlist वर Click करुन नोंदणी (Registration) करावे.

**अथवा**

**masterlist.mhada.gov.in** या संकेतस्थळावर जावून Registration करावे.

Step-२. Login करण्यासाठी नोंदणी (Registration) करताना वापरलेल्या e-mail ID व पासवर्ड (Password) ने Login करावे.

**सदर e-mail ID व पासवर्ड (Password) जतन करुन ठेवावा.**

Step-३. Login केल्यानंतर आपणांस अर्ज करण्याच्या सुचना व पध्दती [Guidelines/ User Manual] दिसून येईल. त्यानुसार आपणांस अर्ज करणे सोपे होईल.

**<u>सूचना :-</u>**

१] नोंदणी(Registration) करताना अर्जदाराचा वैध मोबाईल नंबर आणि ई-मेल पत्ता असणे आवश्यक आहे.

२) अर्ज भरण्याच्यावेळी अर्जदाराकडे खालील कागदपत्रांच्या Scanned Copy असणे आवश्यक आहे.

i] अर्जदाराचा रंगीत फोटो. (jpg format)

ii] अर्जदाराच्या हस्ताक्षर किंवा अंगठयाचा ठसा आदीचा फोटो ( jpg format )

iii] आधार कार्ड (pdf Format)

iv] व्हेकेशन नोटीस , जुन्या इमारतीतील गाळ्यांची भाडेपावती, विद्यूत देयक, संक्रमण शिबीरातील गाळ्याचे वितरण आदेश व ताबा पावती (pdf Format)

v] हस्तांतरण करारनामा (Transfer Agreement) (pdf Format)

Scanned with OKEN Scanner

टीप :-

१. ज्यांना यापूर्वी बृहतसूची समितीने पात्र घोषित केलेले आहे अशा व्यक्तींनी नव्याने अर्ज दाखल करु नये. तसेच ज्या अर्जदारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल केला आहे अशा अर्जदारांनी पुनश्च नव्याने अर्ज दाखल करु नये.

२. तथापि, ज्यांनी यापुर्वी बृहतसुचीकरीता ऑफलाईन पध्दतीने अर्ज केलेला आहे परंतु त्यांचे प्रकरण अद्याप प्रलंबित आहे अशा व्यक्तीनी नव्याने ऑनलाईन अर्ज दाखल करावा.

३. अर्ज यशस्वीरित्या Submit केल्यानंतर, अर्जदाराने स्वत: प्रमाणित केलेले, अर्जासोबत ऑनलाईन दाखल केलेले कागदपत्र ३० दिवसांच्या कालावधीत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर जमा करावीत.

**पत्ता:- खोली क्र. ३७२, दुसरा मजला, म्हाडा गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा पुर्व, मुंबई - ५१.**

४. सुनावणीच्या वेळेस अर्जदाराने सर्व Upload केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती व त्यासंबंधीत कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक आहे.

अर्जदाराची पात्रता व पुनर्रचित / पुनर्विकसित गाळ्याचे वितरण याबाबत म्हाडा अधिनियम १९७६ व विनियम १९८१ तसेच शासनाचे व म्हाडाचे नूतन धोरणातील तरतुदीमधील धोरणानुसार गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल.

**मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मान्यतेने**

दिनांक :- 17/04/2026

उपमुख्य अधिकारी / पु.गा.
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**
**मुंबई**

Scanned with OKEN Scanner